# Washim District Police

**Nature of Work** :- **Proud Moment**

**Police Station** :- **Washim Dist**

**Date of Good Work done** :- **26/01/2023**

**Brief of the work done :-**

वाशिम पोलीस दलातील पोउपनि.सुरेश गाठेकर यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले. त्याबद्दल मा. पोलीस अधीक्षक श्री. @IPS_Bachchan यांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.



# सुरेश गाठेकर ठरले राष्ट्रपती पोलीस पदकाचे मानकरी!

## वाशिम जिल्हा पोलिस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशिम : देशभरातील ९०१; तर महाराष्ट्रातील ७४ पोलिस अधिकारी, शिपायांना राष्ट्रपती पोलीस पदकांची घोषणा २५ जानेवारीला करण्यात आली. त्यात वाशिम येथे कार्यरत श्रेणी पोलिस उपनिरीक्षक सुरेश पुंडलिकराव गाठेकर यांचाही समावेश असून पोलिस दलात गुणवत्तापूर्ण सेवेकरिता त्यांना राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर झाले आहे. त्यांच्या रुपाने वाशिम जिल्हा पोलिस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

वाशिम जिल्हा पोलिस दलातील नागरी हक्क संरक्षण पथकात श्रेणी पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत सुरेश पुंडलिकराव गाठेकर यांना गुणवत्तापूर्ण सेवकरिता राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले. ही बाब संपूर्ण वाशिम जिल्हा पोलीस दलासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

- **बच्चन सिंह**, जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम

सुरेश गाठेकर हे १९८६ मध्ये पोलिस दलात रुजू झाले. प्रारंभीचे काही वर्षे त्यांनी अकोला जिल्हा पोलिस दलात कार्य केल्यानंतर १९९८ पासून वाशिम जिल्हा पोलिस दलात त्यांना नेमणूक मिळाली. तेव्हापासून आतापर्यंतच्या २४ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी सायबर क्राईम सेलमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावली. पोलिस कर्मचाऱ्यांना घर बांधकाम, मुलांचे शिक्षण यासह अन्य कामांसाठी लागणारे कर्ज मिळण्याकरिता बँकांचे उंबरठे झिजवावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन गाठेकर यांनी पुढाकार घेऊन वाशिम जिल्हा पोलिस क्रेडीट सोसायटीची मुहूर्तमेढ रोवली. महाराष्ट्र वेलफेअरमध्ये तीन वर्षे सदस्य म्हणूनही ते कार्यरत होते. सध्या ते नागरी हक्क संरक्षण पथकात कार्यरत आहेत. त्यांच्या अतुलनिय कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर झाले आहे.